डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, संलग्न कृषि महाविद्यालये संलग्न कृषि विद्यालये व ग्रामीण शिक्षण संस्था, वर्धा व अमरावती येथील शिक्षकेतर कर्मचा-यांना ७ व्या वेतन आयोगाच्या शिफारशीच्या अनुषंगाने १ जानेवारी, २०१६ पासून सुधारित वेतन संरचना लागू करण्याबाबत.

# डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला

## अर्थ प्रशासन विभाग

---

वाचा:-१) कृषि व पदुम विभाग, महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांक कृषिवि-३७१९/प्र.क्र.४०/६-अे, दिनांक: १६ फेब्रुवारी,२०२१.
२) शासन परिपत्रक क्र.वेपुर-२०१९/प्र.क्र.८/सेवा-९, दिनांक २० फेब्रुवारी, २०१९.
३) विद्यापीठ प्रशासकीय आदेश क्र.बीईजी/७वे वेतन/शिक्षकेत्तर/०१/२४६३/२०२१, १८ फेब्रुवारी,२०२१.

## आदेश

**जा.क्र.अप्रवि/अंदाज/७-वेतन आयोग/०१/२०२१/** 2251 **दिनांक:** २४ **फेब्रुवारी, २०२१**

महाराष्ट्र शासन कृषी व पदुम विभाग निर्णय क्रमांक कृषिवि-३७१९/प्र.क्र.४०/६-अे, दिनांक: १६ फेब्रुवारी,२०२१ अन्वये कृषि विद्यापीठातील व डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, संलग्न कृषि महाविद्यालये संलग्न कृषि विद्यालये व ग्रामीण शिक्षण संस्था, वर्धा व अमरावती येथील शिक्षकेतर कर्मचा-यांना सातव्या वेतन आयोगाच्या शिफारशीच्या अनुषंगाने सुधारीत वेतन संरचन दिनांक १ जानेवारी, २०१६ पासून मंजुर केला आहे.

त्यानुसार विद्यापीठाने प्रशासकीय आदेश क्र.बीईजी/७वे वेतन/शिक्षकेत्तर/०१/२४६३/२०२१,दि.१८ फेब्रुवारी,२०२१ अन्वये कृषि विद्यापीठातील व डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, संलग्न कृषि महाविद्यालये संलग्न कृषि विद्यालये व ग्रामीण शिक्षण संस्था, वर्धा व अमरावती येथील आस्थापणेवरील शिक्षकेतर कर्मचा-यांना सातव्या वेतन आयोगाच्या शिफारशीच्या अनुषंगाने सुधारीत वेतन संरचन दिनांक १ जानेवारी, २०१६ पासून लागू करण्याचे आदेश निर्गमित केले आहे.

**त्या अनुषंगाने शिक्षकेत्तर कर्मचा-यांचे वेतन निश्चिती करण्यासाठी खालीलप्रमाणे सुचना देण्यात येत आहेत.**

५. **विकल्प:-** सुधारीत वेतन संरचना देण्यासंबंधिचा विकल्प (संदर्भ क्र.२ परिपत्रकात नमुद केल्यानुसार ) च्या संबंधीत कर्मचा-यांचे हे परिपत्रक निर्गमित झाल्यापासून एक महिन्याच्या आत तीन प्रतीत संबंधीत कार्यालयप्रमुख/विभागप्रमुख/नियंत्रण अधिकारी यांना विहीत मुदतीत व विहीत नमुन्यात सादर करावे. त्यानुसार संबंधीतांना विकल्प न दिल्यास त्यांना सुधारीत वेतन संरचना मान्य आहे असे गृहीत धरुन त्यांची सुधारीत वेतन संरचना वेतन निश्चिती दिनांक १ जानेवारी २०१६ रोजी करण्यात यावी. एकदा दिलेला विकल्प अंतिम राहील विकल्पाची एक प्रत कर्मचा-यांच्या सेवा पुस्तकास लावावी. (विकल्प विहीत नमुना शासन अधिसूचना दि.३० जानेवारी,२०१९ मध्ये जोडलेला आहे).

६. **वेतन निश्चिती:-** सुधारीत वेतन संरचनेतील वेतन निश्चिती प्रकरण संदर्भ क्र.२ मधील कलम ७ नुसार जोडपत्र मध्ये दिलेल्या नमुन्यात तीन प्रतीत तयार करावे. संबंधीत शिक्षकेत्तर कर्मचा-यांकडून विकल्प प्राप्त झाल्यानंतर संबंधीत

कार्यालयप्रमुख / विभागप्रमुख/ नियंत्रण अधिकारी यांनी वेतन सरंचना बाबतचे विवरणपत्र तयार करुन ते वेतन व लेखा अधिकारी यांना मंजुरी करिता सादर करावे. वेतन व लेखा अधिकारी यांनी वेतन निश्चिती करुन संबंधीताचे सेवा पुस्तकात नोंद घ्यावी.

७. **थकबाकी अदा करणेबाबत:-** वेतन व लेखाधिकारी यांनी वेतन निश्चिती केल्यानंतर दिनांक १ जानेवारी,२०१६ ते ३१ जानेवारी,२०२१ या कालावधीची थकबाकी काढतांना शासन निर्णय क्र.वेपूर-२०१९/प्र.क्र.१/सेवा-९ , दिनांक ३० मे,२०१९ अन्वये प्रदान करावयाचे आहे. या पैकी दिनांक १ जानेवारी,२०१६ ते ३१ डिसेंबर,२०१८ पर्यंतच्या कालावधीतील सुधारीत वेतन संरचनेतील वेतनाची थकबाकी संदर्भ क्र.१ मधील परिच्छेद क्र.२ नुसार देण्यात यावी. दिनांक १ जानेवारी,२०१९ ते ३१ जानेवारी,२०२१ या कालावधिची थकबाकी रोखीने अदा करण्यात यावी.

८. **महागाई भत्ता:-** शासनाने सुधारीत वेतन संरचना मंजुर केल्याप्रमाणे महागाई भत्त्याचे दर सुध्दा सुधारीत दराने मंजुर केले आहे. शासन वित्त विभाग निर्णय क्र.मभवा-२०१९/प्र.क्र.२/सेवा-९, दि.१ फेब्रुवारी-२०१९, नि.क्र.मभवा-१३१९/प्र.क्र.१३/सेवा-९, दि.८जुलै-२०१९, व क्र.मभवा-१३१९/प्र.क्र.३०/सेवा-९, दि.४जानेवारी-२०२० अन्वये वेळोवेळी मंजूर केलेले महागाई भत्त्याचे सुधारीत दर खालीलप्रमाणे आहेत. हे महागाई भत्त्याचे दर विद्यापीठ व खाजगी अनुदानीत संलग्न संस्थेतील कर्मचा-यांना लागू करण्यात येत आहेत.

| | ज्या दिनांकापासून महागाई भत्त्यातील वाढ अनुज्ञेय आहे तो दिनांक | दरमहा महागाई भत्त्याचा दर |
|---|---|---|
| १ | दिनांक १ जानेवारी २०१६ | काही नाही |
| २ | दिनांक १ जुलै २०१६ | २% |
| ३ | दिनांक १ जानेवारी २०१७ | ४% |
| ४ | दिनांक १ जुलै २०१७ | ५% |
| ५ | दिनांक १ जानेवारी २०१८ | ७% |
| ६ | दिनांक १ जुलै २०१८ | ९% |
| ७ | दिनांक १ जानेवारी २०१९ | १२% |
| ८ | दिनांक १ जुलै २०१९ | १७% |

वरील प्रमाणे वेळोवेळी मंजुर असलेले महागाई भत्त्याचे दर विचारात घेऊन थकबाकी अदा करण्यात यावी.

**५. घरभाडे भत्ता व स्थानीक पुरक भत्ता:-** शासन वित्त विभाग निर्णय क्र.घभाभ-२०१९/प्र.क्र.२/सेवा-५, दि. ५ फेब्रुवारी, २०१९ नसुार शासनाने दिनांक १ जानेवारी, २०१९ पासून सुधारीत दराने घरभाडे भत्ता मंजूर केला आहे. तसेच स्थानिक पूरक भत्ता हा, ते जणू काही असुधारीत वेतनश्रेणीत वेतन घेत आहेत असे मानून त्यांच्या असुधारीत वेतनावर दिनांक ११ डिसेंबर, १९९८ च्या आदेशान्वये विहीत केलेल्या दराने पुढील आदेशपर्यंत देय राहील.

६. **वाहतूक भत्ता :-** शासन वित्त विभाग निर्णय क्र. वाहभ-२०१४/प्र.क्र.५/सेवा-५ दिनांक ०३ जून,२०१४ नुसार वाहतूक भत्ता मंजूर करतांना त्या कर्मचा-याची असुधारीत वेतनश्रेणी व वाहतूक भत्त्याचे सध्या लागू असलेले दर लक्षात घेऊन मंजूर करण्यात यावा.

**७. अ)** वेतन निश्चिती केल्यानंतर कर्मचा-यांचे माहे फेब्रुवारी, २०२१ चे वेतन सुधारीत दराने काढावे.

**ब)** दिनांक ०१/०१/२०१६ ते ३१/०१/२०१८ या कालावधीच्या थकबाकीची रक्कम शासन निर्णयाच्या अनुषंगाने संबंधीत कर्मचा-यांच्या भविष्य निर्वाह निधी खात्यात जमा करण्याचे व राष्ट्रीय निवृत्तीवेतन/परिभाषित अशंदान निवृत्ती योजना लागू असलेल्या कर्मचा-याबाबतीत रोखीने अदा करण्याबाबतचे आदेश स्वतंत्ररीत्या निर्गमीत करण्यात येतील.

वरील संबंधितांनी काटेकोर पालन करावे.

**मा.कुलगुरु यांच्या मंजुरीने.....**

नियंत्रक
डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ
अकोला

**प्रत:-**

१.विभाग प्रमुख (सर्व)/ कार्यालयीन प्रमुख (सर्व)/ आहरण व संवितरण अकधकारी (सर्व) यांना माहिती व पुढील कार्यवाहीस्तव.

२. वेतन व लेखाधिकारी, डॉ.पं.दे.कृ.वि.अकोला / नागपूर यांना (पाच प्रति) माहिती व पुढील कार्यवाहीस्तव.

३. प्रायार्च ................................................................................

४. नियंत्रण अधिकारी (सर्व)

५.कुलसचिव, डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला

६. प्रभारी अधिकारी, संगणक प्रणाली कक्ष, डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला यांना विद्यापीठ संकेत स्थळावर प्रसारणाकरीता

**प्रतिलिपी:-**

कुलगुरु यांचे स्विय सहाय्यक, डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला यांना मा.कुलगुरु यांच्या माहिती करीता सादर.

स्वा/-
नियंत्रक
डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ
अकोला